सोलापूर तरुण भारत
दिनांक
• शुक्रवार, दि. १४ मे २०१० पान- १

# पद्मजा फेणाणी यांचे रविवारी गायन



सोलापूर (वार्ताहर) : श्री गजानन महाराज ,शिवपुरी,अक्कलकोट यांच्या जन्मोत्सवानिमित्त वेद विज्ञान अनुसंधान संस्थेतर्फे रविवार दि.१६ रोजी रात्री ९ वा. वेदविज्ञान अनुसंधान संस्था ,शिवपुरी येथे पद्मश्री पद्मजा फेणाणी जोगळेकर यांच्या गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जितेंद्रकुमार जाजू यांनी पत्रकार परिषदेत दिली. वेद विज्ञान अनुसंधान संस्थेतर्फे दरवर्षी श्री गजानन महाराजांचा जन्मोत्सव साजरा करण्यात येतो. त्यानिमीत्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. हा कार्यक्रम पद्मजा फेणाणी यांनी शिवपुरी येथून प्रसारित होणारा स्वामी संदेश, अग्निहोत्र, वैदिक जीवन पद्धती यांच्या प्रसारासाठी घेतला असल्याचे जाजू यांनी सांगितले. गजानन महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त हवन, गणेशयाग,महामृत्युंजय मंत्राचे हवन आदि धार्मिक कार्यक्रमांचेही आयोजन केले आहे. अधिक माहितीसाठी विद्याधर पारीख ९८५०८५५१२९, अमर चौधरी ९३७२४०९४६८, जितेंद्रकुमार जाजू ९४२२५८३९००.या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस विठ्ठल शिरसिकर , विद्याधर पारखे उपस्थित होते.